| | | |
|---|---|---|
| | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ<br>अमरावती विभागीय मंडळ अमरावती.<br>MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION | |

पत्र क्रं अविमं/माप/ 2057

दि 22/०९/२०२६

**प्रति,**

मा. उपसंचालक,

माहिती व जनसंपर्क कार्यालय,

अमरावती विभाग अमरावती.

**विषय :-** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) फेब्रु-मार्च-२०२७ मध्ये आयोजीत कारावयाच्या परीक्षांच्या तारखांबाबत.

**संदर्भ :-** पत्र क्रं रा.म./परीक्षा-६/३९१५, दि.१७/०९/२०२६ रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकित पत्रास अनुसरुन आपणास सविनय सादर करण्यात येते की, फेब्रुवारी/मार्च २०२७ मध्ये आयोजीत करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेचा लेखी,प्रात्याक्षीक,तोंडी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा आयोजीत करावयाच्या तारखांबाबतचे प्रकटन या पत्रासोबत जोडलेले आहे. सदर प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावी.

आपली विश्वासू

(प्रिया देशमुख)

विभागीय सचिव,

अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

**सहपत्र :-** प्रकटनाची प्रत

प्रतिलिपी :-

१) मा.सचिव राज्य मंडळ, पुणे

२) मा. विभागीय उपसंचालक, अमरावती विभाग अमरावती यांना माहीतीस्तव.

३) शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीस्तव.

४) मुख्याध्यापक/प्राचार्य,सर्व मान्यताप्राप्त शाळा, अमरावती विभाग अमरावती यांनी सदर बाब शिक्षक, विदयार्थी, पालक व सर्व संबंधित घटक यांच्या निदर्शनास आणुन दयावी.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

विषय— उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा फेब्रु—मार्च २०२७ लेखी परीक्षा आयोजनाबाबत...

## प्र क ट न

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छ.संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत फेब्रु—मार्च २०२७ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी, प्रात्यक्षिक, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा खालील कालावधीत आयोजित करण्यात येणार आहेत.

| अ. क्र. | तपशील | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षा कालावधी | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा कालावधी |
|---|---|---|---|
| १) | लेखी परीक्षा | सोमवार, दि. ०८ फेब्रुवारी, २०२७ ते मंगळवार, दि. १६ मार्च २०२७ | सोमवार, दि. १५ फेब्रुवारी,२०२७ ते गुरुवार, दि. ११ मार्च, २०२७ |
| २) | प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन | बुधवार, दि. २० जानेवारी २०२७ ते शनिवार, ०६ फेब्रुवारी २०२७ | गुरुवार, दि. २८ जानेवारी २०२७ ते शनिवार, १३ फेब्रुवारी २०२७ |

शाळा / कनिष्ठ महाविद्यालय व विद्यार्थी यांना अभ्यासक्रमाचे नियोजन करण्याचे हेतूने तसेच विद्यार्थ्यांच्या मनावरील ताण कमी होण्याचे दृष्टीने फेब्रुवारी—मार्च २०२७ च्या प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेच्या संभाव्य तारखा जाहीर करण्यात येत आहेत.

प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मूल्यमापन परीक्षा व लेखी परीक्षांचे विषयनिहाय सविस्तर वेळापत्रक स्वतंत्रपणे मंडळाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

उपरोक्त बाबत सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०९/२०२६

(डॉ. दिपक माळी)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे ४.